दिनांक ०३.१०.२०२५ रोजी सहकार विभागाचे अमरावती येथील अधिकारी यांचे समवेत अवैध सावकारी प्रकरणाबाबत बैठक व चर्चा





दिनांक ०३.१०.२०२५ रोजी मा. विभागीय आयुक्त, अमरावती तथा कार्यकारी संचालक, कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन यांचेसमवेत मिशन संबंधी कामकाजाबाबत बैठक व चर्चा तसेच मिशनची कार्यपुस्तिका भेट



दिनांक ०४.१०.२०२५ रोजी नरखेड, जि. नागपूर येथे नुकसानग्रस्त शेतक-यासमवेत बैठक व चर्चा




दिनांक ०४.१०.२०२५ रोजी नरखेड, जि. नागपूर येथे शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीन नुकसानीची व मोसंबी फळबाग गळती पाहणी करताना






दिनांक ०६.१०.२०२५ रोजी नागपूर येथे आदिवासी विभागाच्या अपर आयुक्त यांच्या समवेत भेट व मिशनचे कामकाजासंबंधी चर्चा तसेच मिशनची कार्यपुस्तिका भेट



**दिनांक ०८.१०.२०२५ रोजी विश्रामगृह, सिंदखेडराजा, जि. बुलढाणा येथे तालुका स्तरीय अधिकारी यांचे समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या, चारा लागवड व अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान व करण्यात आलेली मदत यासंबंधी बैठक**





**दिनांक ०८.१०.२०२५ रोजी डावरगांव, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा येथे मृतक संतोष माळचिमणे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट**





दिनांक ०८.१०.२०२५ रोजी विश्रामगृह, देऊळगांवराजा, जि. बुलढाणा येथे तालुका स्तरीय अधिकारी यांचे समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या, चारा लागवड व अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान व करण्यात आलेली मदत यासंबंधी बैठक





लोकमत

# हेलोंडेंनी घेतली आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांची भेट



आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांची भेट घेताना ॲड.नीलेश हेलोंडे व अन्य.

लोकमत न्यूज नेटवर्क

**बुलढाणा :** वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे यांनी बुधवारी सिंदखेडराजा तालुक्यातील डावरगाव येथील संतोष माळचिमणे या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला की नाही याची माहिती घेतली. तसेच शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना सुरू आहेत. त्यांचा लाभ गावखेड्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे, असे निर्देश ॲड. नीलेश हेलोंडे यांनी अधिकाऱ्यांना दिले. तहसीलदार अजित दिवटे, तालुका कृषी अधिकारी भागवत किंगर, गटविकास अधिकारी अभिजित बांगर, भास्कर घुगे, महिला बालकल्याणचे अधिकारी जीवन राठोड व ग्रामस्थ उपस्थित होते.

देशोन्नती

# ॲड.निलेश हेलोंडे यांनी घेतली डावरगाव येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबियांची भेट

देशोन्नती वृत्तसंकलन



**बुलढाणा :** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी बुधवारी सिंदखेड राजा तालुक्यातील डावरगाव येथील संतोष माळचिमणे या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी जावून त्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली.

यावेळी त्यांनी कुटुंबियांशी संवाद साधत त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला की नाही याची माहिती घेतली. तसेच शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना सुरु आहेत. त्यांचा लाभ गावखेड्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे, असे निर्देश ॲड. निलेश हेलोंडे यांनी अधिकाऱ्यांना दिले. यावेळी तहसीलदार अजित दिवटे, तालुका कृषी अधिकारी भागवत किंगर, गटविकास अधिकारी अभिजित बांगर, भास्कर घुगे, महिला बालकल्याणचे अधिकारी जीवन राठोड व ग्रामस्थ उपस्थित होते. (जिमाका)

Buldhana Edition
Oct 09, 2025 Page No. 8
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# शेतकऱ्यांनी सिल्क अँड मिल्क मॉडेल स्वीकारावे : ॲड. नीलेश हेलोडे

**सिंदखेड राजा, दि. ८ (प्रतिनिधी)**



शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांना समृद्ध आणि स्वावलंबी होण्यासाठी शेतकऱ्यांनी 'रेशीमची शेती आणि त्याला दुधासाठी जोडधंदा गाई, म्हशी पाळा म्हणजेच शेतकऱ्यांनी सिल्क अँड मिल्क हे मॉडेल स्वीकारून स्वावलंबी व्हावे, असे मत वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोडे यांनी व्यक्त केले.

सिंदखेडराजा तालुक्यातील डावरगाव येथील संतोष माळचिमणे या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची भेट घेतली. कुटुंबियांशी संवाद साधत त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला की नाही, याची माहिती घेतली. त्यानंतर विश्रामगृहावर त्यांनी तहसीलदार अजित दिवटे, कृषी अधिकारी भागवत किंगर, गट विकास अधिकारी अजित बांगर, महिला आणि बालविकास प्रकल्पाचे जीवन राठोड यांच्यासह विविध अधिकाऱ्यांची बैठक घेऊन शेतकरी आत्महत्यांची माहिती जाणून घेतली. यावेळी 'पुण्यनगरी'शी बोलताना त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा होण्यासाठी पारंपरिक शेतीबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढवावे. तसेच रेशीम शेती व दुधाळ जनावरांचे पालन हेदेखील जोपासावे. प्रत्येक गावात 'सिल्क अँड मिल्क' योजना राबवली गेल्यास शेतकरी खऱ्या अर्थाने समृद्ध होईल. लवकरच 'गाव तेथे गोदाम' योजना राबविण्यात येणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांना स्वतःचे उत्पन्न साठवण्यासाठी गावातच गोदामाची सुविधा मिळेल. यामुळे शेतमालाचे संरक्षण होईल आणि त्या आधारे शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यासही मदत होणार आहे. दुधाळ जनावरांसाठी चाऱ्याची समस्या दूर करण्यासाठी गायरान जमिनीवर शासनाच्या वतीने चाऱ्याची पेरणी करून शेतकऱ्यांना तो पुरवण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. बांधावर प्रयोगशाळा, या संकल्पनेचा उल्लेख करताना प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत शासनाच्या सर्व योजना पोहोचल्या पाहिजेत. शेतीत आधुनिक प्रयोग, संशोधन आणि प्रशिक्षण अत्यंत आवश्यक असल्याच्या सुचना अधिकाऱ्यांना केल्या.

Buldhana Edition
Oct 09, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

**दिनांक ०८.१०.२०२५ रोजी पांगरी, ता. देऊळगांवराजा, जि. बुलढाणा येथे मृतक गजानन देवराव वाघ शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट**





**आढावा •** वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे यांचे अधिकारी, कर्मचाऱ्यांना निर्देश

# शेतकऱ्यांपर्यंत त्यांच्या हिताच्या योजना पोहोचल्या पाहिजे

**प्रतिनिधी** | बुलडाणा

केंद्र व राज्य शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना सुरु आहेत. त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. त्यासाठी प्रशासनाने सातत्याने पाठपुरावा करण्याचे निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे यांनी दिले.

ते बुधवारी सिंदखेड राजा तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात त्यांनी तालुक्यातील शेतकरी आत्महत्या, चारा लागवड व अतिवृष्टीमुळे नुकसान व मदतीसंदर्भात आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले.

ॲड. नीलेश हेलोंडे यांनी तालुक्यातील शेती पद्धतीचा आढावा घेताना शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांबरोबर चिया, रेशीम, चारा लागवडीला प्राधान्य देण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. चिया, रेशीम लागवडीसाठी शेतकऱ्यांना मदत करावी. शेतकरी समृद्ध व्हावा यासाठी सर्वांनी महत्वाची भूमिका घ्यायला पाहिजे. कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान विकसित होत आहेत. या तंत्रज्ञानाच्या आधारे शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी प्रोत्साहित करावे. कृषी विभागाने शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी. योजनांची अंमलबजावणी गतीने झाली पाहिजे. तालुक्यात प्रक्रिया उद्योग आणि दुग्ध व्यवसायाला चालना द्यावी, चारा लागवडीचे प्रमाण वाढवावे, रोजगार व स्वयंरोजगार निर्माण करावे. उद्योग सुरु करु इच्छिणाऱ्यांना कर्ज पुरवठा झाला पाहिजे. शाश्वत बाजारपेठ, गोदाम उपलब्ध करुन द्यावे. शेतकऱ्यांच्या बांधावर प्रयोगशाळा सुरु कराव्यात, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. शेतकरी सक्षम झाला पाहिजे. या बैठकीला तहसीलदार अजित दिवटे, तालुका कृषी अधिकारी भागवत किंगर, गटविकास अधिकारी अभिजित बांगर, पोलिस निरीक्षक अमोल इंगळे, भास्कर घुगे, अधिकारी जीवन राठोड आदी उपस्थित होते.



आत्महत्याग्रस्त कुटुंबियांशी चर्चा करताना नीलेश हेलोंडे.

## डावरगाव येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांची भेट

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे यांनी बुधवारी सिंदखेडराजा तालुक्यातील डावरगाव येथील संतोष माळचिमणे या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी जावून त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबियांशी संवाद साधत त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला की नाही याची माहिती घेतली. तसेच शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना सुरु आहेत. त्यांचा लाभ गावखेड्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे, असे निर्देश ॲड. नीलेश हेलोंडे यांनी अधिकाऱ्यांना दिले. यावेळी तहसीलदार अजित दिवटे, तालुका कृषी अधिकारी भागवत किंगर, गटविकास अधिकारी अभिजित बांगर, भास्कर घुगे, महिला बालकल्याणचे अधिकारी जीवन राठोड व ग्रामस्थ उपस्थित होते.

दैनिक

**दिव्य मातृछाया**

# शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा; शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा – ॲड. निलेश हेलोंडे

- दिव्य मातृछाया
- सुरेश हुसे

## डावरगाव येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांची घेतली भेट!



सिंदखेड राजा : "शेतकरी समृद्ध झाला पाहिजे, हेच माझे ध्येय आहे. शासनाच्या योजना केवळ कागदावर न राहता त्या थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत," असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी केले.

ते आज दिनांक ८ ऑक्टोबर रोजी सिंदखेडराजा तालुक्याच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी तालुक्यातील शेतकरी आत्महत्या, चारा लागवड, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान आणि शासकीय मदत याबाबतचा आढावा येथील विश्रामगृहात घेतला.

या बैठकीत बोलताना ॲड. हेलोंडे म्हणाले, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाचे अनेक प्रयत्न सुरू आहेत. पारंपरिक शेतीबरोबरच चिया, रेशीम, चारा लागवड यांसारख्या पर्यायी शेती पद्धतींना चालना देणे आवश्यक आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना या नव्या पद्धतींसाठी प्रोत्साहित करावे."

त्यांनी पुढे सांगितले की - कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रक्रिया उद्योग, दुग्ध व्यवसाय आणि स्वयंरोजगाराच्या संधींना चालना दिली पाहिजे. उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्यांना कर्जपुरवठा, शाश्वत बाजारपेठ व गोदाम सुविधा उपलब्ध करून द्याव्यात."

यानंतर ॲड. हेलोंडे यांनी डावरगाव येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी संतोष माळचिमणे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांनी पत्नी हरणाबाई संतोष माळचिमणे आणि मुलगा वैभव माळचिमणे यांच्याशी संवाद साधून शासकीय योजनांचा लाभ मिळाल्याची माहिती घेतली.

संतोष माळचिमणे यांच्या कुटुंबावर असलेले ५० हजार रुपयांचे कर्ज बँकेमार्फत मार्गी लावण्यासाठी त्यांनी तहसीलदारांना व स्टेट बँक अधिकाऱ्यांना चर्चेचे आदेश दिले. यावेळी सरपंच संदीप देशमुख, ग्रामविकास अधिकारी दीपक मेहेत्रे, मंडळ अधिकारी सुनील टेकाळे, ग्राम महसूल अधिकारी राहुल देशमुख तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्याचे आदेश देताना त्यांनी सांगितले, प्रत्येक शेतकऱ्याच्या बांधावर प्रयोगशाळा सुरू करण्याचा विचार व्हावा. शेतकऱ्यांचे सशक्तीकरण हेच खरी अर्थाने ग्रामीण विकासाचे प्रतीक आहे." या बैठकीला तहसीलदार अजित दिवटे, तालुका कृषी अधिकारी भागवत किंगर, गटविकास अधिकारी अजित बांगर, पोलीस निरीक्षक आशिष इंगळे, विस्तार अधिकारी भास्कर घुगे, महिला व बालकल्याण अधिकारी जीवन राठोड आदी मान्यवर उपस्थित होत.

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर

# शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा- ॲड. हेलोंडे



**बुलढाणा,(महासागर प्रतिनिधी)** : केंद्र व राज्य शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना सुरु आहेत. त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. त्यासाठी प्रशासनाने सातत्याने पाठपुरावा करण्याचे निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी दिले.ते बुधवारी सिंदखेड राजा तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात त्यांनी तालुक्यातील शेतकरी आत्महत्या, चारा लागवड व अतिवृष्टीमुळे नुकसान व मदतीसंदर्भात आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले.ॲड. निलेश हेलोंडे यांनी तालुक्यातील शेती पद्धतीचा आढावा घेतांना शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. शेतकऱ्यांनी पारंपरिक पीकांबरोबर चिया, रेशीम, चारा लागवडीला प्राधान्य देण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. चिया, रेशीम लागवडीसाठी शेतकऱ्यांना मदत करावी. शेतकरी समृद्ध व्हावा यासाठी सर्वांनी महत्त्वाची भूमिका घ्यायला पाहिजे. कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान विकसित होत आहेत या तंत्रज्ञानाच्या आधारे शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी प्रोत्साहित करावे. कृषी विभागाने शासनाच्या योजना शेतकऱ्यापर्यंत पोहोचवावी. योजनांची अंमलबजावणी गतीने झाली पाहिजे. तालुक्यात प्रक्रिया उद्योग आणि दुग्ध व्यवसायाला चालना द्यावी, चारा लागवडीचे प्रमाण वाढवावे, रोजगार व स्वयंरोजगार निर्माण करावे. उद्योग सुरु करु इच्छिणाऱ्यांना कर्ज पुरवठा झाला पाहिजे. शाश्वत बाजारपेठ, गोदाम उपलब्ध करुन द्यावे. शेतकऱ्यांच्या बांधावर प्रयोगशाळा सुरु कराव्यात, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. शेतकरी सक्षम झाला पाहिजे. ही माझी भूमिका असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीला तहसीलदार अजित दिवटे, तालुका कृषी अधिकारी भागवत किंगर, गटविकास अधिकारी अभिजित बांगर, पोलीस निरिक्षक अमोल इंगळे, भास्कर घुगे, महिला बालकल्याण विभागाचे अधिकारी जीवन राठोड आदी उपस्थित होते.

तरुण भारत
Akola Main | 2025-10-09 | Page- 14
epaper.tarunbharat.net

# शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा

## ॲड. नीलेश हेलोंडे यांचे निर्देश

◆ **बुलढाणा, ८ ऑक्टोबर**

केंद्र व राज्य शासनाद्वारे शेतकरी हिताच्या योजना सुरु आहेत. त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. त्यासाठी प्रशासनाने सातत्याने पाठपुरावा करण्याचे निर्देश वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे यांनी दिले.

बुधवार ८ ऑक्टोबर रोजी सिंदखेडराजा तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात त्यांनी शेतकरी आत्महत्या, चारा लागवड व अतिवृष्टीमुळे नुकसान व मदतीसंदर्भात आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले.

ॲड. निलेश हेलोंडे यांनी तालुक्यातील शेती पद्धतीचा आढावा घेताना शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांबरोबर चिया, रेशीम, चारा लागवडीला प्राधान्य देण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. चिया, रेशीम लागवडीसाठी शेतकऱ्यांना मदत करावी. शेतकरी समृद्ध व्हावा यासाठी सर्वांनी महत्त्वाची भूमिका घ्यायला पाहिजे असे आवाहन केले.



ॲड. नीलेश हेलोंडे

कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान विकसित होत आहेत या तंत्रज्ञानाच्या आधारे शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी प्रोत्साहित करावे. कृषी विभागाने शासनाच्या योजना शेतकऱ्यापर्यंत पोहोचवावी. योजनांची अंमलबजावणी गतीने झाली पाहिजे. तालुक्यात प्रक्रिया उद्योग आणि दुग्ध व्यवसायाला चालना द्यावी, चारा लागवडीचे प्रमाण वाढवावे, रोजगार व स्वयंरोजगार निर्माण करावे. उद्योग सुरु करु इच्छिणाऱ्यांना कर्ज पुरवठा झाला पाहिजे असेही सांगितले.


शाश्वत बाजारपेठ, गोदाम उपलब्ध करून द्यावे. शेतकऱ्यांच्या बांधावर प्रयोगशाळा सुरु कराव्यात, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. या बैठकीला तहसीलदार अजित दिवटे, तालुका कृषी अधिकारी भागवत किंगर, गटविकास अधिकारी अभिजित बांगर, पोलीस निरिक्षक अमोल इंगळे, भास्कर घुगे, महिला बालकल्याण विभागाचे अधिकारी जीवन राठोड आदी उपस्थित होते. ◀*(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web

दि.१०.१०.२०२५ रोजी कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे तसेच रोजगार हमी योजनेचे अधिकारी यांचे समवेत मिशन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे मिशन संबंधी योजना व चारा लागवडीबाबत बैठक व चर्चा



दिनांक १०.१०.२०२५ रोजी सहकार विभाग, अग्रणी बँकेचे अधिकारी यांचे समवेत मिशन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे अवैध सावकारी व कर्जवाटप बाबत बैठक व चर्चा



दिनांक १०.१०.२०२५ रोजी पुरपरिस्थीतीमुळे उद्भवलेल्या रोगराईबाबत आरोग्य विभागाकडून करण्यात आलेल्या उपाययोजनाबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे समवेत मिशन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे बैठक व चर्चा




दिनांक १०.१०.२०२५ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनाबाबत महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी यांचे समवेत मिशन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे बैठक व चर्चा




**दिनांक १३.१०.२०२५ रोजी अवैध सावकारांविरुध्द तक्रार करण्यासंबंधी आवाहन करण्याबाबत फ्लेक्स चे उद्‌घाटन कार्यक्रमास विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, अमरावती कार्यालयामध्ये उपस्थित**









आपल्या शहरातील प्रत्येक बातमी

SOCIAL MEDIA EDITION

॥ श्रीकृष्णम् वंदे जगतगुरुम् ॥

आता रोज रहा अपडेट!

# अध्ययन समाचार

संपादक : जितेंद्र रोडे

सुविचार
वाचन हे ज्ञानाच्या सागराचे द्वार आहे.

कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805

भ्रमणध्वनी : 9422158005
दुरध्वनी : 07223-222005

jitendrarode77@gmail.com
Adhayayn Samachar

गुरूवार दि. १६ ऑक्टोबर २०२५


## अवैध सावकारी व्यवहारात शेतकरी व त्यांचे कुटुंबीयांनी निर्भिडपणे तक्रार करावी- -ॲड. निलेश हेलोंडे

**अध्ययन समाचार वृत्तसेवा**
**अमरावती दि. १६ प्रतिनिधी**

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश केशवराव हेलोंडे पाटील यांनी महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम 2014 अंतर्गत अवैध सावकारी तक्रारी संबंधात नुकताच आढावा घेतला. विदर्भ व मराठवाडा विभागात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी बाधंवांचे अतोनात नुकसान झालेले असल्यामुळे शेतकरी व त्यांचे कुटुंबीय आर्थिक विवचंनेत आहेत. शेतकरी व त्यांचे कुटुंबीयांची अवैध सावकारी व्यवहारात पिळवणुक होऊ नये यासाठी त्यांनी शेतकरी बांधवांनी व व त्यांचे कुटुंबीयांनी निर्भिडपणे तक्रार करावी ,असे आवाहन केले आहे.

अवैध सावकारी व्यवहारात शेतकरी व त्यांचे कुटुंबियांचे फसवणूक, पिळवणूक होत असल्यास त्यांनी अमरावती सहकार विभागात अवैध सावकारी करणाऱ्या सावकाराविरूध्द तक्रार संबंधीत जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक, सरकारी संस्था याचे कार्यालयात तसेच अमरावती जिल्ह्याकरीता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती व उपनिबंधक सहकारी संस्था, तालुका अमरावती सहकार संकूल, कांतानगर अमरावती - 444602कार्यालयीन ईमेल क्रमांक ddr_amr @rediffmail.com/dyr.amr.amravati@gmail.com यावर करण्यात याव्यात तसेच तालुका स्तरावरील सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयातही तक्रार नोंदवू शकतात.

जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार, उपनिबंधक सुधीर खंबायत,सहायक निबंधक गजानन डावरे, कार्यालय अधीक्षक अनिरुद्ध राऊत, सत्यजीत पोले, दिपक गासे,प्रशांत ढोके,सचिन शहाकार, सतिश समर्थ व कार्यालयीन कर्मचारी यावेळी उपस्थित होते.


नेचर्स नाईस सोलर

Govt- Electrical Contractor

- रुफ टॉप सोलर सिस्टीम सप्लायर्स.
- सोलर गीजर सप्लायर्स.
- सर्व इलेक्ट्रीकल इंजिनियरिंग वर्क्स.

सोलर बसवा, वीज बिलापासुन मुक्ती मिळवा

इंजि- अनिकेत पी.देवतळे
B.E.Electrical Engg.
M.Tech (PEPS)



अध्ययन समाचार

कठोरा नाका, अमरावती/साई प्लाझा,दर्यापूर 8788296561/8275395466

**दिनांक १३.१०.२०२५ रोजी बोराळा, ता. दर्यापुर येथे मृतक पुरुषोत्तम सहदेव तायड़े शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट**






Shiva Gold
ZINC + BORON
Granular
शिवा गोल्ड
50 kg
SHIVA GLOBAL AGRO INDUSTRIES LTD.

# जागर मराठी

# राज्यमंत्री ॲड.निलेश हेलोंडे यांची बोराळा येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट



**दै.जागर मराठी**

**दर्यापूर = किरण होले**

दर्यापूर तालुक्यातील बोराळा या गावातील शेतकरी पुरुषोत्तम शहादेव तायडे याने दि.26/9/2025 रोजी आत्महत्या केली होती, त्या पिडीत कुटुंबाच्या अडचणी समजून घेऊन, त्या दूर करण्याचे उद्देशाने, निलेश हेलोंडे, अध्यक्ष, कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य यांनी भेट दिली, आत्महत्या ग्रस्त कुटुंबातील लंकाबाई शहादेव तायडे, प्रतीक्षा शहादेव तायडे, जयदेव शहादेव, सोमेश्वर शहादेव तायडे हजर होते, त्यावेळी महसूल, पंचायत, पशुधन, कृषी, शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. निलेश हेलोंडे, यांनी पिडीत कुटुंबाची आस्थेने विचारपूस करून, त्यांचे कडे असलेल्या शेतात पेरणीकरिता कपाशी बियाणे आणि छक्क्ष चा फॉर्म भरून घेऊन टोकनयंत्र देणे बाबत तालुका कृषी अधिकारी यांना निर्देश दिले. येत्या फेब्रुवारी महिन्यापूर्वी जनावरे देण्याचे संबंधी विहित अर्ज भरून घेण्याचे तालुका पशुधन अधिकारी यांना सूचना दिल्या. राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजने अंतर्गत या कुटुंबातील मुलीला सायकल वाटप करण्याचे निर्देश गटशिक्षणाधिकारी यांना भेटी दरम्यान दिले. तसेच उपस्थित ग्राम महसूल अधिकारी यांना आपाद ग्रस्त कुटुंबातील व्यक्तींची संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ सेवा योजना अंतर्गत प्रकरणे तयार करून मंजूरी करिता पाठवण्यास सांगितले. गावातील ग्रामपंचायत कार्यालय, बोराळा येथे उपस्थित सर्व विभागातील अधिकारी यांची बैठक घेण्यात येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजने संबंधी माहिती देण्यात येऊन, नवीन विहीर, बोअर, शेततळे मधील प्लास्टिक अस्तरीकरण, शेततलाव मधील मत्स्य पालन बाबत माहिती देऊन गावकरी यांचा मार्गदर्शन करण्यात आले, त्यावेळी तालुक्याचे तहसीलदार डॉ. रविंद्र कानडजे, नि. नायब तहसीलदार प्रमोद काळे, गट विकास अधिकारी, पी.डी. धवक, तालुका कृषी अधिकारी आरती साबळे, पशुधन अधिकारी, महिला बाल विकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी संतोष घुगे, मंडळ अधिकारी मीनाक्षी बाहेकर मॅडम, मंडळ अधिकारी राजेश मिरगे, ग्राम महसूल अधिकारी बासुंदे मॅडम, शिक्षक भडांगे सर, राहुल तेलमोरे, वाळके मॅडम, सहायक कृषी अधिकारी व गावकरी उपस्थित होते.

दैनिक पोलीस न्यूज

epaper.dainikpolicenews.com
15 Oct 2025 - Page 8

# राज्यमंत्री ॲड. हेलोंडे यांची बोराळा येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट; अडचणी दूर करण्याचे आश्वासन

**दर्यापूर । पोलीस न्यूज नेटवर्क**



दर्यापूर तालुक्यातील बोराळा येथील शेतकरी पुरुषोत्तम शहादेव तायडे यांनी दि. २६/०९/२०२५ रोजी आत्महत्या केली होती. या पिडित कुटुंबाच्या अडचणी समजून घेऊन त्या दूर करण्याच्या उद्देशाने, कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य चे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी नुकतीच या कुटुंबाला भेट दिली.

यावेळी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील लंकाबाई शहादेव तायडे, प्रतीक्षा शहादेव तायडे, जयदेव शहादेव आणि सोमेश्वर शहादेव तायडे हे उपस्थित होते. तसेच, महसूल, पंचायत, पशुधन, कृषी आणि शिक्षण विभागाचे अधिकारीही उपस्थित होते.

अधिकारी वर्गाला दिले निर्देशः

निलेश हेलोंडे यांनी पिडित कुटुंबाची आस्थेने विचारपूस केली आणि त्यांच्याकडील शेतात पेरणीकरिता कपाशी बियाणे उपलब्ध करून देण्याचे, तसेच 'डीबीटी' (DBT) चा फॉर्म भरून घेऊन टोकन यंत्र देण्यासंबंधी तालुका कृषी अधिकारी यांना निर्देश दिले. येत्या फेब्रुवारी महिन्यापूर्वी जनावरे देण्यासंबंधी विहित अर्ज भरून घेण्याच्या सूचना तालुका पशुधन अधिकारी यांना देण्यात आल्या. तसेच, राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजनेअंतर्गत या कुटुंबातील मुलीला सायकल वाटप करण्याचे निर्देश गटशिक्षणाधिकारी यांना भेटीदरम्यान देण्यात आले.

यासोबतच, उपस्थित ग्राम महसूल अधिकारी यांना आपद्ग्रस्त कुटुंबातील व्यक्तींची संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ सेवा योजना अंतर्गत प्रकरणे तयार करून मंजुरीकरिता पाठवण्यास सांगण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेची माहितीः

बोराळा येथील ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेसंबंधी माहिती देण्यात आली. नवीन विहीर, बोअर, शेततळ्यातील प्लॅस्टिक अस्तरीकरण, तसेच शेततलावातील मत्स्यपालन यांबाबत गावकरी यांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी तालुक्याचे तहसीलदार डॉ. रविंद्र कानडजे, नि. नायब तहसीलदार प्रमोद काळे, गट विकास अधिकारी पी.डी. धवक, तालुका कृषी अधिकारी आरती साबळे, पशुधन अधिकारी, महिला बाल विकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी संतोष घुगे, मंडळ अधिकारी मीनाक्षी बाहेकर, मंडळ अधिकारी राजेश मिरगे, ग्राम महसूल अधिकारी बासुंदे, शिक्षक भडांगे, राहुल तेलमोरे, वाळके, सहायक कृषी अधिकारी व गावकरी उपस्थित होते.

लोकमत

# हेलोंडे यांची आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**दर्यापूर :** तालुक्यातील बोराळा येथील शेतकरी पुरुषोत्तम शहादेव तायडे यांनी आत्महत्या केली. त्यांच्या निवासस्थानी मंगळवारी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे यांनी भेट देऊन विविध योजनांचे साहाय्य मिळवून देऊन अडचणी दूर करण्याचे आश्वासन दिले. त्यापूर्वी खासदार बळवंत वानखेडे यांनी कुटुंबीयांचे सांत्वन करून योग्य ती मदत करण्याचे निर्देश दिले होते.

पुरुषोत्तम तायडे यांनी २६ सप्टेंबरला आत्महत्या केली. ॲड. नीलेश हेलोंडे यांनी कुटुंबातील लंकाबाई शहादेव तायडे, प्रतीक्षा शहादेव तायडे, जयदेव शहादेव आणि सोमेश्वर शहादेव तायडे यांची भेट घेतली. त्यांनी पीडित कुटुंबाची आस्थेने विचारपूस केली आणि त्यांच्याकडील शेतात पेरणीकरिता



कपाशी बियाणे उपलब्ध करून देण्याचे तसेच डीबीटीचा फॉर्म भरून घेऊन टोकन यंत्र देण्यासंबंधी तालुका कृषी अधिकाऱ्यांना निर्देश दिले. फेब्रुवारी महिन्यापूर्वी जनावरे देण्यासंबंधी अर्ज भरून घेण्याच्या सूचना तालुका पशुधन अधिकारी यांना दिल्या. राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजनेंतर्गत या कुटुंबातील मुलीला सायकल वाटप करण्याचे निर्देशही दिले.

## कृषी स्वावलंबन योजनेची माहिती

१. बोराळा येथील ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेसंबंधी माहिती देण्यात आली.

२. नवीन विहीर, बोअर, शेततळ्यातील प्लास्टिक अस्तरीकरण तसेच शेततलावातील मत्स्यपालन याबाबत गावकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

३. यावेळी तहसीलदार डॉ. रवींद्र कानडजे, निवासी नायब तहसीलदार प्रमोद काळे, गटविकास अधिकारी पी.डी. धवक, तालुका कृषी अधिकारी आरती साबळे, गटशिक्षणाधिकारी संतोष घुगे व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

Hello Amravati
Page No. 2 Oct 16, 2025
Powered by: erelego.com

दिनांक १३.१०.२०२५ रोजी ग्रामपंचायत बोराळा, ता. दर्यापूर येथे तालुकास्तरीय अधिकारी यांचे समवेत मिशनसंबंधी विषयाची बैठक व चर्चा





**दिनांक १५.१०.२०२५ रोजी मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृह, अमरावती येथे महाराष्ट्र राज्य किसान सभा द्वारा आयोजीत अखिल भारतीय संत्रा उत्पादक परिषद - २०२५ या कार्याक्रमास उपस्थित**






# संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी सर्वंकष प्रयत्नांची गरज : ॲड. निलेश हेलोंडे

## संत्रा उत्पादक परिषद २०२५, अमरावती



अमरावती दि.१५ : संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी सर्वंकष प्रयत्नांची गरज असल्याचे मत स्व. वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशन महाराष्ट्र चे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य किसान सभा द्वारा आयोजित अखिल भारतीय संत्रा उत्पादक परिषद २०२५ स्थानिक मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृह अमरावती येथे संपन्न झाली. संत्रा उत्पादक परिषदेचे उद्घाटन स्व. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्र चे अध्यक्ष निलेश हेलोंडे यांनी केले. यावेळी ते बोलत होते.


संत्रा उत्पादक परिषदेच्या उद्घाटकीय सत्राचे अध्यक्ष कॉ. राजन क्षीरसागर राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय किसान सभा हे होते. प्रमुख अतिथी म्हणून खासदार बळवंतराव वानखडे अमरावती , खासदार अमर भाऊ काळे, एड. धनंजय तोटे अध्यक्ष संत्रा बागायतदार संघटना, के व्ही व्ही प्रसाद, आंध्र प्रदेश कॉ. तुकाराम भस्मे, ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते एड. हिरालाल परदेशी अध्यक्ष महाराष्ट्र राज्य किसान सभा, प्रा. साहेबराव विधळे, कॉ. अशोक सोनारकर हे उपस्थित होते.

संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्येची सुरुवात झाली आहे ही दुर्दैवी बाब असल्याचे हेलोंडे यांनी मत व्यक्त केले. स्थानिक बाजारपेठेमध्ये संत्रा विक्री करीता टोल नाका, बस ,रेल्वे स्टेशन या ठिकाणी संत्रा उत्पादकांना जागा देण्यात यावी याकरीता श्री हेलोंडे यांनी प्रयत्न केलेले सांगितले. संत्रा फळ पिकाकरिता सरकारने एमएसपी जाहीर करावी याचे समर्थन श्री हेलोंडे यांनी केले. संत्रा प्रक्रिया उद्योग व संरक्षणाकरता सरकार व संत्रा उत्पादकांनी पुढाकार घ्यावा ही भूमिका त्यांनी मांडली. संत्रा रस्त्यावर फेकल्या जातो ही राष्ट्रीय बातमी होत नाही हे आपल्या भागाचे दुर्दैव *(उर्वरित पान २ वर)*

### संत्रा बोर्डची स्थापना करा : कॉ. राजन क्षीरसागर

बदलते हवामान तंत्रज्ञान व आयात निर्यात धोरण लक्षात घेता महाराष्ट्रातील संत्रा उत्पादकांसाठी सर्वंकष बोर्डची स्थापना करण्याची मागणी अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष कॉ. राजन क्षीरसागर यांनी केली. ते पुढे म्हणाले डब्ल्यू .एच. ओ .च्या मानकानुसार २६० ग्रॅम फळ अन्नामध्ये असणे आवश्यक आहे . ते प्रमाण भारतीयांमध्ये फक्त ६५ ग्रॅम असल्याचे निदर्शनास येते. फळांच्या सेवनामध्ये जागतिक क्रमवारी मध्ये भारताचा क्रमांक १३२ वा आहे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मध्यान भोजनामध्ये व माता बालसंगोपनामध्ये फळांचा समावेश करावा अशी मागणी त्यांनी केली.

# 'त्या' मंडपात नातेवाईकांचा ठिय्या



ॲग्रोवन

# संत्रा बागायतदारांसाठी महामंडळ उभारा

## अखिल भारतीय संत्रा परिषदेत तज्ज्ञांची मागणी

ॲग्रोवन वृत्तसेवा

**अमरावती :** बदलते हवामान, तंत्रज्ञान आणि आयात-निर्यात धोरण अशी अनेक आव्हाने संत्रा उत्पादकांच्या समोर आहेत. त्याची दखल घेत स्वतंत्र बोर्ड किंवा महामंडळ स्थापण्याची गरज असल्याचे मत (कै.) वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने आयोजित अखिल भारतीय संत्रा परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विमलताई देशमुख सभागृहात पार पडलेल्या या परिषदेला खासदार बळवंत वानखडे, खासदार अमर काळे, ॲड. धनंजय तोटे, के.व्ही.व्ही. प्रसाद, तुकाराम भस्मे, ॲड. हिरालाल परदेशी, साहेबराव विघळे, अशोक सोनारकर उपस्थित होते.

ॲड. हेलोंडे पुढे म्हणाले, की कापूस आणि इतर पारंपरिक पिकांचे उत्पादन होणाऱ्या भागात आणि त्यातही मुख्यत्वे कोरडवाहू पट्ट्यात यापूर्वी शेतकरी आत्महत्या होत होत्या. नजीकच्या काळात संत्रा बागायतदारांच्या आत्महत्यांची देखील नोंद झाली असून हा प्रकार दुर्दैवी आहे. त्यामुळेच शासनस्तरावरून ही बाब गांभीर्याने घेत संत्रा बाजारपेठेचा विस्तार होण्याच्या अनुषंगाने टोल नाका, रेल्वे, विमानतळ, बसस्थानक अशा ठिकाणी संत्रा विक्रीकरिता आऊटलेटची उपलब्धता करण्याची गरज आहे. संत्रा फळांची बाजारपेठ अस्थिर आहे. त्या पार्श्वभूमीवर सरकारने इतर शेतीमालाप्रमाणे संत्रा फळांकरिता देखील हमीभाव जाहीर करावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. दराअभावी दर वर्षी संत्रा फळे रस्त्यावर फेकली जातात; परंतु त्याची राष्ट्रीयस्तरावरील माध्यमातून साधी दखलही घेतली जात नाही. शासनाचे या फळपीकाकडे लक्ष जाण्यासाठी माध्यमांमध्ये याविषयी चर्चा झाली पाहिजे. त्याशिवाय या फळाला राजाश्रय मिळू शकणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

तर संसदेत संत्रा उत्पादकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणार असल्याचे खासदार वानखडे यांनी सांगितले. संत्रा उत्पादक परिषदेच्या कामकाजाकरिता अध्यक्ष मंडळाची या वेळी निवड करण्यात आली. त्यामध्ये अरविंद वानखडे, संदीप रोडे, संजय मंगळे, विनोद जोशी, ॲड. हिरालाल परदेशी यांचा समावेश आहे.



**अमरावती : महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने आयोजित संत्रा परिषदेत मार्गदर्शन करताना वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील.**

### ...असे घेतले ठराव

- नुकसानग्रस्त संत्रा बागायतदारांना हेक्टरी एक लाखांची मदत.
- संत्रा पीक संशोधनासाठी एकात्मिक धोरण.
- फळाच्या दर्जा सुधारासाठी कृषी संसाधने व सुविधा.
- संत्रा फळपीकाला हमीभाव.
- सक्षम संत्रा विपणन, आयात, निर्यात धोरण.
- फळपीक विमा योजनेचे पुनर्निरीक्षण करून त्यात सुधारणा.

### 'पोषण आहारात व्हावा समावेश'

जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार शरीराला पोषक घटकांचा पुरवठा होण्यासाठी २६० ग्रॅम फळाचा दैनंदिन आहारात समावेश असला पाहिजे. परंतु भारतीयांमध्ये हे प्रमाण अवघे ६५ ग्रॅम आहे. शालेय पोषण आहारात संत्रा फळांचा समावेश झाल्यास उत्पादकांचे व्यापक हित जपले जाणार आहे. त्यासोबतच उत्पादकांना देखील हमखास बाजारपेठेचा पर्याय उपलब्ध होईल. त्याकरिता शासनाने पुढाकार घ्यावा, असे मत अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष राजन क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

दिनांक १५.१०.२०२५ रोजी अमरावती येथे ऑनररी अवार्ड सेरेमनी कार्यक्रमास उपस्थित






दिनांक २३.१०.२०२५ रोजी डोंगरगांव, ता. नरखेड, जि. नागपूर येथे  येथे पारधी तांडयावर कार्यक्रमास उपस्थित






दिनांक २८.१०.२०२५ रोजी विदर्भ व मराठवाड्यात दुधाचे उत्पन्न वाढून रोजगार निर्मिती संदर्भात, नागपूर येथे डॉ. बोरानी, संचालक, विदर्भ मराठवाडा दुग्ध प्रकल्प यांच्या सोबत बैठक.




दिनांक २८.१०.२०२५ रोजी केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, नागपूर येथील शास्त्रज्ञ यांच्यासोबत बैठक व चर्चा तसेच भेट व पाहणी




Shot on Y50
AI Quad camera


Shot on Y50
AI Quad camera

दिनांक २९.१०.२०२५ रोजी अमरावती येथे मा. श्री. दादासाहेब गवई यांचे स्मारक उदघाटन कार्यक्रमास उपस्थित





**दिनांक ३०.१०.२०२५ रोजी अमरावती येथे मा. खा. श्री. अनिल बोंडे, यांचे समवेत मिशनचे कामकाजासंबंधी बैठक व चर्चा**

